Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए,
फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी
शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

2232
क्र.रा.मं./परीक्षा-३/6088
दिनांक -०३/११/२०२२

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा.संचालक,दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई-४०००३०
४) मा.संचालक,आकाशवाणी,मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ,मुंबई- ४०००२०
५)मा.संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा.संपादक, सर्व वृत्तपत्र/वृत्तवाहिन्या

विषय-फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या नियमित शुल्कास मुदतवाढ व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.

महोदय,

फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी)परीक्षेची आवदेनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी त्यांच्या वृत्तपत्रात/ प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,
(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण त्यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे
३) अस्वीस, राज्यमंडळ, पुणे४)ग्रंथालय,राज्य मंडळ, पुणे ५) ऑनलाईन विभाग ६)शाखा लेखा

प्रत माहितीसाठी सविनय सादरः-

१) मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
३) मा. आयुक्त, (शिक्षण) शिक्षण आयुक्तालय, पुणे-४११००१

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे ४११००४

|| प्रकटन ||

**विषय**–फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या नियमित शुल्कास मुदतवाढ व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी–मार्च २०२३परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या नियमित, व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र(Enrollment Certificate)प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी(Private Candidate), तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारेTransfer of Creditघेणारे विद्यार्थी)चे विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.inया संकेतस्थळावर भरावयाची मुदत दिनांक ०५.११.२०२२ रोजी संपत असून त्यांच्या नियमित शुल्काने मुदतवाढीच्या तारखा व विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत **शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Databaseवरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा तसेच** व्यवसाय अभ्यासक्रम HSC vocationalStreamशाखांचे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Creditघेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची नियमित शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या **मुदतवाढीच्या** तारखा व विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे | **उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन काढून शुल्क बँकेत भरावयाची मुदत** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| नियमित शुल्क | रविवार दि.०६.११.२०२२ ते मंगळवार दि.१५.११.२०२२ | शुक्रवार दि.०२.१२.२०२२ पर्यंत |
| विलंब शुल्क | बुधवार दि. १६.११.२०२२ ते बुधवार दि. ३०.११.२०२२ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | |

अ) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क RTGSद्वारे भरणा केल्याच्या RTGS/NEFT पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करावयाची तारीख बुधवार , दि.०७/१२/२०२२

ब) सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज Loginमधून Pre-listउपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळणी करून अचूक असल्याची खात्री करावी.सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर प्रिलिस्ट परीक्षा फी चलन व विद्यार्थी यादीसोबत विभागीय मंडळाकडे जमा करावी.

-२-

इ.१२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१– खालील तपशीलाप्रमाणे विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क खाली नमूद केलेल्या बँकेमध्ये मध्ये RTGS/NEFT द्वारे भरणा करुन चलनाची प्रत तसेच विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

१. पुणे, औरंगाबाद व कोल्हापूर :— Bank of India Virtual Account

२. मुंबई, नागपूर व लातूर :— HDFC Bank Virtual Account

३. अमरावती, नाशिक व कोकण :— AXIS Bank Virtual Account

२–आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन Downloadकरुन चलनावरील Virtual Account मध्ये NEFT/RTGSव्दारे भरावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी NEFT/RTGSद्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच Account Number व IFSc Code चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

३– उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहित परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत याची नोंद सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रमुखांनी घ्यावी.

४– उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण व अचूक शुल्क भरल्याची खातरजमा विभागीय मंडलस्तरावर करुन त्याबाबतचा अहवाल गणकयंत्र विभागाच्या नमून्यात राज्यमंडळ कार्यालयास सादर केल्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येतील.

५– विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन Save होत नसल्यास त्यांनी उपरोक्त दिलेल्या मुदतीत All Application च्या लिंकवरून आवेदनत्रे भरावयाची आहेत.

६– नियमित तसेच विलंब शुल्क स्वतंत्र RTGS/NEFT द्वारे भरण्यात यावे.

७–नियमित शुल्काने तसेच विलंब शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

८– अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखां यथावकाश कळविण्यात येतील.

दिनांकः– ०३ /११/२०२२

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

कोविमं/१२ वी परीक्षा/
दिनांक :- ०४/११/२०२२

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, (सातारा/ सांगली / कोल्हापूर.)

**विषय- फेब्रवारी-मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देणे व चलन Download करुन भरण्याच्या व प्रि-लिस्ट, विद्यार्थी यादी जमा करणेच्या तारखांबाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने फेब्रुवारी/मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी ) परीक्षेच्या ऑनलाईन आवेदनपत्रे सादर करण्या बाबतच्या पत्रानुसार आवश्यक कार्यवाही करावी आणि **दि.०७/१२/२०२२** रोजी विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट,चलने आणि एक्सेल यादी तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची यापूर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत, प्रिलिस्ट दुरुस्ती पाकिटे वितरण केंद्रावर जमा करावयात. व वितरण केंद्रांनी दि.०८/१२/२०२२ रोजी मंडळाकडे जमा करावयाची आहेत.

विभागीय सचिवांकरिता,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.